(कौटुंबिक न्यायालयातील सत्य घटनांवर आधारित कथा)

# टिकला... तो संसार !!...




ॲड. अरुण गोविंद देशमुख

## मनोगत

आपले आयुष्य म्हणजे वेगाने लिहिलेली तुमच्यावरील एक खास अशी कादंबरी असते. यात अनेक छोट्या-मोठ्या कथा घडत जातात आणि तुमच्या आयुष्याला रोचक बनवत जातात. काही कथा या मनावर खोलवर जात व्रण करतात तर काही तुम्हाला तुमच्या आयुष्यांत सुखावून जातात. काही आजूबाजूला घडत जातात आणि तुम्हाला वाकुल्या दाखवत असतात तर काही तुम्हाला तुमच्या नकळत त्या कथांमधील एक पात्र बनवत जातात.

मी वकील या नात्याने अनेक मजेशीर किस्से जवळून अनुभवले. अर्थात कौटुंबिक न्यायालयाचे वातावरण तसे एका हॉस्पिटलहून वेगळे नसते. गंभीर असणाऱ्या या वातावरणात मजेशीर असे अनेक प्रसंग सहसा घडत नसतात. वकिलांसाठी मात्र त्यातही गमती-जमती असतातच. असे जरी मी म्हटले तरी कथासंग्रहातील या कथा सर्वसामान्य नाहीत. काहींमध्ये तर एवढा मसाला भरलेला आहे की त्यावर एक हजार एपिसोडची सिरियल चालेल एवढी उपकथानके व पात्रे दिसून येतात. काही अतर्क्य वाटतील, तर काही आपल्याला सर्वसाधारणपणे आजूबाजूला घडणाऱ्या कथांसारख्याच वाटतील. हे नक्कीच सांगता येईल की **'घटस्फोट आणि पोटगी'** या माझ्या पुस्तकामुळे मला बाहेरील विविध शहरांमधील दावे लढता आले, बघता आले आणि अनुभवतासुद्धा आले. एक वकील सर्वसाधारणपणे आपल्या कक्षेतच फिरत असतो. फक्त काही मोजकेच वकील कुठे दावा असेल तर लढण्यास जातात. मला **'घटस्फोट आणि पोटगी'** या माझ्या पुस्तकामुळे मुंबईसह साऱ्या महाराष्ट्रात नागपूर, पुणे, सावंतवाडी, सिंधुदुर्ग, नाशिक, औरंगाबाद, वसई, अलिबाग, पनवेल, कल्याण, ठाणे, नगर अशा विविध जागी प्रत्यक्ष जाऊन दावे लढण्यास दावेदार मिळाले, खऱ्या अर्थाने ते माझ्या पुस्तकांचे वाचक होते.

मनोरमा प्रकाशनासाठी मी विविध विषयांवरील पुस्तके लिहीत असताना प्रत्येक वेळी मनोरमाचे प्रकाशक श्री. अनिल फडके यांच्याशी मी विविध बाबींवर चर्चा करीत असे. माझ्या विशिष्ट पुस्तकावरील चर्चा झाल्यावर त्या त्या महिन्यात झालेल्या भन्नाट कथा त्यांना मी ऐकवत जायचो. त्यांना मी अनुभवलेले विदारक तसेच विविध दावे सांगत असताना मी व ते दोघेही रंगून जायचो. माझी कथा शांतपणे ऐकत असताना त्यावर टीकाटिपण्णी करीत सदर कथा आवडली असल्यास ते मला त्याबाबतीत लगेच तोंडावर कौतुक करीत. या दाव्यातील गोष्टी 'कथा'या साहित्याच्या माध्यमातून योग्य तऱ्हेने शब्दबद्ध व्हायला हव्यात असे आग्रहाने सांगायचे!

दरवेळी मी त्यांना हो, हो म्हणत खो खो खेळानुसार हुलकावणीच द्यायचो. मला स्वतःला कथासंग्रहापेक्षा कादंबरी हा साहित्यप्रकार जास्त आवडायचा, कदाचित त्यामुळे असेल. पण, मी काही त्या बाबतीत पुढे अधिक हालचाल करीत नसे. अर्थात दिवसागणिक मला आलेल्या भन्नाट अनुभवांची संख्या वाढायला लागली व लेखक म्हणून मला त्या प्रत्येक दाव्यामध्ये एक लपलेली कथा दिसायची. अनेक वळणे घेणाऱ्या अशिलांच्या या कथा तुम्ही कथासंग्रहाद्वारे माझ्या वाचकांसाठी लिहाव्या असे अनेक दिवसांपासून प्रकाशकांचे जे म्हणणे होते, त्यात मला आता तथ्य वाटू लागले.

अर्थातच मी माझ्या वकिली व्यवसायामुळे माझ्या इतर लिखाणांमध्ये व्यस्त असल्याने हा विषय बाजूलाच पडायचा. मात्र प्रकाशक श्री. अनिल फडके यांनीच ही बाब मनावर घेत २०१७ ला कथासंग्रह लिहावा असा माझ्या मागे आग्रह धरला आणि **'टिकला... तो संसार ...!!'** हा कथासंग्रह घडला. ह्या साऱ्या कथा म्हणजे खरं तर माझे खरेखुरे दावेदार आणि वाचक मंडळी यांच्याच आहेत. नावे जरी बदलली असली तरी त्या दाव्यातील पात्रांना ही कथा आपलीच आहे हे दोन मिनिटात कळेल हे नक्की. कायदाविषयक घडलेल्या सत्यघटनांवरील हे पुस्तक अनेकांना रोचक तर वाटेलच, पण वकील या प्राण्याला कधी कधी काय काय प्रसंगांना सामोरे जावे लागते त्याची अनेक उदाहरणे यात आहेत. काही प्रसंगांतील पुरुष पात्रांकडे बघताना पुढील ओळी सहज सुचून गेल्या.

संसार असाच टाकून कशी निघून गेलीस?
वादळातला वारा होऊन निघून गेलीस !!
मनाच्या भावभावना चुरगळून गेलीस...
येते न म्हणता, अशी कशी निघून गेलीस?
स्वप्ने गोड होती, मृगजळ बनून गेलीस...
पालवी फुटलेल्या कोंबाला टाकून गेलीस
बुडणाऱ्या बोटीत उंदीर बनून गेलीस...
वादळ येण्याआधीच अर्धी होऊन गेलीस
हाती हात देत आजही टेकू बनून गेलीस...
नको सोडू आस बनवून स्वतःच गेलीस..
इच्छा नसताही संसार बनून गेलीस...
तिथेच पाऊलखुणा उमटवून गेलीस !
चाललो होतो एकत्र नसत्याच शरीरानं...

थिजली जशी होती मन, मन दुरावल्यानं
बघत होते दैव जोडी मेथी, कोथिंबिरीची...
जातकुळ वेगळी होती जरी बांधल्यानं
दैव हरले आज पुन्हा नाही बोललो शब्द...
बोलणारच कसे आम्ही मन दुरावल्यानं!

'टिकला ...तो संसार ...!!' हा कथासंग्रह लिहिण्याचे प्रमुख कारण माझी भूमिका ही मानसिक व सकारात्मकरित्या बऱ्याच वेळेस संसार टिकावा याकडे झुकणारी होती. अनेकांचे संसार टिकावे या उद्देशाने मी केलेले प्रयत्न यात दिसून येत असून यात मी बजावलेली भूमिका महत्त्वाची आणि मार्गदर्शकाची आहे. अर्थात माझ्यासारखाच कोणीतरी वकील तुमच्यासाठी प्रत्येक वेळी काहीतरी चांगलं करेल ही भाबडी समजूत करू नये. तसे आपल्या नशिबात आले तर आनंदच आहे. अर्थात आलेले चांगले-वाईट अनुभव म्हणूनच कथन करताना आपण आपला चेहरा यात कुठे दिसतो का हे नक्की पाहावे व जमल्यास तिथे मी त्या त्या पात्राला दिलेला मार्ग अवलंबावा, अशी माफकच अपेक्षा तुमच्याकडून माझी आहे.

मी लिहिलेल्या कथा या पूर्वीच्या युगात लिहिलेल्या वाटाव्या इतपत बदल समाजात आज घडत आहे. आजच्या युगात दोन माणसेच काय बहुतांशी जोडपीसुद्धा बाजूबाजूने चालताना मोबाईलवर तिसऱ्याशीच बोलताना आढळतात. म्हणजे आपण चालतो आहे त्याच्याशी बोलायला वेळ नाही, पण तिसऱ्याशी दूरध्वनीवरून असे काय बोलायचे असते देव जाणे. खाजगी जीवनात काहीतरी गोपनीय असावे की नाही? आपल्या कुटुंबासाठी काही क्षण बाजूला काढायलाच हवे असे मला तरी वाटते. याचाच अर्थ आज आपण संपूर्णत: वेबच्या जाळ्यात फसत चालले आहोत.

आज फेसबुकवरचा त्रयस्त मित्र आपणास आपल्या पार्टनरपेक्षा जास्त आपुलकीचा व प्रेमळ वाटत असेल तर खरंच आपल्या एकूणच विचारांमध्ये काहीतरी गडबड होते आहे हे लक्षात घ्यावे. वास्तव नेहमी अंगावर येत असते व त्याला तोंड देत उभे राहण्यापेक्षा त्यापासून पळून जात ह्या वेबच्या मृगजाळात आपण स्वत:लाच गुरफटून टाकत आहोत असे मला वाटते. अर्थात आजच्या युगात त्यामुळे फेसबुकवरचा मित्र आपल्या जीवनसाथीपेक्षा जास्त जवळचा वाटत जातो व आजच्या युगात ही ठिणगी भयानक आहे हे मात्र नक्की.

मला अर्थात प्रकाशकांनी कथासंग्रह लिहा असे सांगितले

तेसुद्धा कौटुंबिक न्यायालयातील दाव्यांवर आधारित कथासंग्रह लिहा असे जेव्हा सांगितले तेव्हा मलाच गंमत वाटली. याचे कारण, ज्यावेळी मी **'घटस्फोट आणि पोटगी'** हे पुस्तक लिहिले त्यावेळी ते पुस्तक कोण वाचेल व त्याला वाचक वर्ग मिळेल का याबाबतची शाश्वती स्वत: प्रकाशक या नात्याने त्यांना नव्हती. मात्र जेव्हा ह्या पुस्तकाने माझी पाचवी आवृत्ती गाठली तेव्हा त्यांनाही या विषयावर वाचनासाठी लिखाणाची गरज आहे हे लक्षात आले.

मी मात्र एक निश्चित सांगेन की **'घटस्फोट आणि पोटगी'** ह्या माझ्या पुस्तकामुळेच मला फार वेगवेगळ्या अशा केसेस अनुभवायास मिळाल्या. आधी नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्र म्हणजे थेट सिंधुदुर्ग-ओरसपासून थेट नागपूर-नाशिक-पुण्यापर्यंत तर ठाणे, कल्याण—पनवेल, अलिबाग ते थेट वसईपर्यंत मी दावे लढलो. मुंबईच्या वकिलाला मुंबईव्यतिरिक्त मुंबई-बाहेर इतक्या ठिकाणी दावे लढवण्यास जाणे तसे फार कष्टदायक असायचे. मात्र दाव्यातील दाहकता, एक वाचक म्हणून माझे लेखक या नात्याचे वेगळेच नाते व अशील म्हणून त्याने दाखविलेला माझ्यावरच्या विश्वासामुळे त्या दाव्यांना मी सामोरे गेलो. या निमित्ताने अनेकजण कायमचे मित्र झाले. खरं सांगायचे तर या दाव्यामधील काही कथांमध्ये मला व माझ्या घरच्यांनाही प्रत्यक्षात अतिशय त्रास झाला, जो सहन करताना मी त्यासाठी संबंधित व्यक्तीला कधीही दोषी मानले नाही.

या सर्व दाव्यांमधील निवडक १२ कथा मी या कथासंग्रहासाठी निवडल्या असून त्यातील पात्रांची नावे बदलली आहेत. यातील काही कथा अंगावर येतात तर काही कथा सत्य असल्या तरी त्या काल्पनिकही वाटतील परंतु त्या अशा घडलेल्या आहेत, हे पूर्ण सत्य आहे. या सर्व कथा सत्यघटनांवर आधारित असून यातून अनेकांना प्रबोधन होईल असेच मला वाटते. या सर्व वाचकांसाठीच ही मनातील कविता...

वादळातला वारा होऊन निघून गेलीस !!
खेळ हा ऊन पावसाचा तसा घसरण्याचा,
रडून हसण्याचा, खेळ हा ऊन पावसाचा
खेळ हा जसा ओसाड कधी तिच्या विरहाचा,
कधी पूर्ण मिलनाचा जसा हिरवा गालिचा
खेळ हा पडल्यावर खुदकन हसण्याचा,
दु:ख लपवत आसवे चिंब भिजवण्याचा

आपल्यासमोर 'टिकला ...तो संसार !!..' हा कथासंग्रह सादर करताना मला मनापासून आनंद होत आहें. आपण कथासंग्रह हा आगळावेगळा साहित्य प्रकार कधी लिहू असे मला चुकूनही वाटले नव्हते. अर्थात त्याचे कारण मी मागे दिलेले आहे की, मला हा प्रकार कधीच भावला नाही. मात्र अर्थात हा प्रयत्न करीत असताना त्याची वेगळीच मजा आली. एक खास वेगळा अनुभव म्हणून त्या कथांमधील प्रत्यक्ष पात्रांना मी बोलावून त्यांच्या या कथा त्यांना वाचायला लावल्या. दोन सेकंदात ही कथा माझी आहे असे आश्चर्य उद्‌गार त्यांनी काढले व संपूर्ण कथा वाचल्यावर खरंच ती अंगावर काटा आणणारी झाली आहे व याचा त्यांना प्रत्यक्षात आपला जीवनपटच वाचायला मिळाला, असे त्यांनी आनंदाने सांगितले.

'टिकला ...तो संसार !!..' हे सदर पुस्तक पूर्णपणे संगणकावर टाईप करीत लिहिलेले आहे. ह्या पुस्तकाचे संपादन आणि मुद्रणसंस्कार माझे पत्रकार, स्नेही व शिवछत्रपती पुरस्कारपटू (क्रीडा संघटक) श्री. मनोहर आ. साळवी यांनी केलेले आहे. सदर पुस्तकास दोन शब्द भगवान दत्तात्रय सत्संग मंडळचे अध्यक्ष श्री. महेश बापट यांनी लिहिलेले असून या सर्वजणांचे मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे. ह्या पुस्तकातील सर्वच अनुभव मी सांगितल्याप्रमाणेच प्रत्यक्षात घडलेले असून माझ्यावर माझ्या अशिलांनी विश्वास टाकला त्यामुळेच त्यांना मी योग्य न्याय देऊ शकलो. त्यासाठी मी या सर्वसंबंधित मंडळींचा आभारी आहे.

सर्वात शेवटी व महत्त्वाचे म्हणजे हे पुस्तक लिखाण करण्याची संधी मलाही मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांच्यामुळे मिळाली व आतापर्यंत त्यांच्या पाठिंब्यामुळेच ही साहित्यसेवा अखंडित चालू ठेवता आली. हे पुस्तक लिखाणादरम्यानच त्यांचे देहावसान झाले, त्यांची इच्छा असल्याने यापुढे मी मनोरमासाठीचे माझे लेखनकौशल्य चालूच ठेवणार असून त्यांनी मला दिलेल्या लेखनाच्या संधीबद्दल, मानाबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन!

हे पुस्तक सर्वसामान्य व्यक्तीसाठी नक्कीच उपयोगी ठरेल अशी मला आशा वाटते. वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहील अशीच ईश्वरचरणी प्रार्थना करून मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम....

**ॲड. अरुण गोविंद देशमुख**
लेखक

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अस्तनीतील निखारा | १३ |
| २. | वेगळी चूल | २५ |
| ३. | बाईलखुळा | ४३ |
| ४. | बदला | ५३ |
| ५. | तमाशा | ६५ |
| ६. | गोंधळ | ७६ |
| ७. | सातवा संसार | ९० |
| ८. | नशिबाची थट्टा | १०२ |
| ९. | पूर्वाची आई | ११४ |
| १०. | राडेबाज सासरा | १२५ |
| ११. | शर्त माझी, तुझी आणि त्याची | १३८ |
| १२. | सच्चा मजनू शेवटी घरजावई | १४९ |

# १. अस्तनीतील निखारा



रात्रीचे १२.३० वाजलेले असताना मी व्हॉट्सअपचे मेसेज बेडवर पडून सहज चाळताना मोबाईलच्या चार्जिंगला लावलेल्या दुसऱ्या मोबाईलची रिंग वाजली. उगाच कोणाची अवेळी आलेल्या मोबाईलच्या आवाजाने झोपमोड होऊ नये म्हणून धाडकन उठून मी तो मोबाईल उचलला. इतक्या रात्री कोणी केला असेल मोबाईल? असा विचार मनात करता करता, पाहिले तर पत्रकार अमितचा फोन.

"सर, माझी सुटका करा हो! मी आता येऊ? तुम्हाला मी भेटूनच सांगेन, फक्त मला सोडवा यातून..."

अमितचा असा कधी नव्हे तो काकुळतीचा आवाज ऐकून माझ्या मनात चर्रर.. झाले. अमित तसा निगरगट्ट व्यक्तिमत्त्व असलेली अशी व्यक्ती होती. त्याला असा काकुळतीला आणणारा प्रसंग कसला असेल. आताच तर

त्याला आपण त्याचे प्रेम मिळवून दिले. आता काय बरं प्रसंग आला असेल याच्या जीवनात? माझ्या डोक्यात भुंगा फिरत होता. मी त्याला सकाळी ९.३० ला भेट म्हणून सांगितले असतानाही तोच सकाळी सकाळी ७.०० वाजता माझ्या घरी हजर झाला.

''अरेच्चा, अमित तू इतक्या लवकर?''

मला तर अमितचे सकाळचे येण्याने आश्चर्यच वाटले. तसं पहाता अमित कुठच्याही प्रसंगात न घाबरणारा प्राणी होता! अमितचा चेहरा काळवंडलेला पाहून मला तर बहुतेक मारामारी झालेली वाटत होती. केस विस्कटलेले व नजर कावरीबावरी आणि शर्टाची खेचाखेच झालेली असल्याने त्याची एक-दोन बटणे गायब होती.

''चल, आताच्या आता नाक्यावरच्या इराण्याच्या हॉटेलात जाऊ आणि चर्चा करू.''

अमितने जो प्रस्ताव ठेवला तो मी लगेच मान्य केला आणि आम्ही जवळच्या इराण्याच्या हॉटेलात पोहोचलो. इराण्याच्या हॉटेलात गेल्यावर अमितने कटिंगची ऑर्डर दिली व आपली कथा सांगण्यास सुरुवात केली.

''तुला माहीत आहेच की, माझे आणि दीपालीचे अनेक वर्षांपासूनचे प्रेमसंबंध होते. मी तिच्यावर व ती माझ्यावर खूप प्रेम करत होती. परंतु तिच्या वडिलांना मी पसंत नव्हतो. तिचे लहानपणीच तिच्या आत्ये-भावाशी लग्न त्यांनी निश्चित केलेले होते. आमच्या या प्रेमप्रकरणामुळे त्यांना हृदयविकाराचा झटका आलेला होता. ह्याच गोष्टीला ब्लॅकमेल करून त्यांनी तिचे लग्न तिच्या आत्ये-भावाशी जबरदस्तीने गावाला नेऊन लावले होते.''

अमितने गोष्ट सांगण्यास सुरू केली असली तरीही त्याच्या या गोष्टीतला वकील मीच होतो. जेव्हा त्याने दीपालीला माझ्याकडे भेटायला आणले तेव्हा मॉड दिसणारी दीपाली इंग्रजीतच माझ्याशी बोलली. तिने मला स्पष्ट सांगितले की, तिचे मनाविरूद्ध जबरदस्तीने जरी लग्न झाले असले तरी तिने तिच्या नवऱ्याला पहिल्या रात्री स्पष्ट सांगितले, ''माझं तुझ्यावर प्रेम नाही! माझं बाहेर प्रेमप्रकरण चालू आहे व वडिलांच्या तब्येतीमुळेच मी तुझ्याशी लग्न केलेलं आहे. त्यामुळे मी तुला माझ्या अंगालाही स्पर्श करू देणार नाही!, स्वत:ची इज्जत प्यारी असेल तर गुमानं बाजूच्या सोफ्यावर जाऊन झोप !!''

अमितने पूर्वी घडलेला आपल्या जीवनातला प्रसंग मला पुन्हा ऐकवला. तो आपली कथा सांगत असताना तोंडावरचा घाम पुसत होता.

चहाचा घुटका घेत त्याने मला विचारले, "अरुण, तुला आठवतं का तिची अशी चार वर्षे गेलेली असताना तुझ्याच मदतीने मी तिला तिच्या नवऱ्यापासून घटस्फोट मिळवून दिलेला... आठवतंय का?"

मी 'हो' म्हटले कारण प्रकरण काय जास्त जुने नव्हते आणि लगेचच अमितने तिच्याशी नोंदणी पद्धतीने लग्न केलेले होते. अमितने परवडत नसतानाही सायन प्रतीक्षानगरमधल्या पत्रकारांसाठीच्या जागेत पैसे भरलेले होते. आता स्वतंत्र राहत असल्याने त्याचा आता तर सुखी संसार सुरू झालेला पाहिजे, मग आता काय? माझ्या तोंडावरचे प्रश्नचिन्ह लपवत मी अमितला बोललो,

"हो आठवतंय मला ते सारं! तिचा तो रुबाबदार वावर, इंग्रजीवरची हुकूमत, बावचळलेला चष्मीस नवरा आणि सहा महिन्यांनंतर प्रत्यक्षात समत्तीने घटस्फोट दिल्यावर तिचं आपल्या नवऱ्याला बाय बाय करत तुझ्या गाडीवरून जाणं.. सर्व प्रसंग मला आता डोळ्यासमोर चटकन आला आहे. पण मित्रा, मला सांग आता काय प्रॉब्लेम आहे?"

माझ्या प्रश्नांकित चेहऱ्याकडे अमितने पाहून आपली मान नकारार्थी हलवत हताश होत तो चढ्या आवाजात उद्वेगाने उद्‌गारला,

"छे! कसला सुखी संसार? आता तर मी आगीतून चक्क फुफाट्यात पडलो आहे रे !!"

त्याच्या तर या शब्दांवर माझा मुळीच विश्वास बसत नव्हता. जी मुलगी लग्न होऊनही आपल्या नवऱ्याला चक्क आपल्या पूर्वप्रेमापोटी चार वर्षे स्वत:पासून जाणीवपूर्वक दूर ठेवू शकते. शिवाय सर्वसामान्यपणे तिने ज्याच्यासाठी हा उद्‌व्याप केला ती प्रिय व्यक्ती जोडीदार म्हणून लाभल्यावरसुद्धा ती कशी काय संसारातील निखारा बनू शकते? मला तर त्याच्या बोलण्यावर विश्वास बसत नव्हता. बहुतेक याचीच काहीतरी आगळीकपणा असणार असा माझा तरी ठोकताळा होता. मी अमितकडे बघत शांतपणे त्याला सांगितले,

"काय झालं ते तुझ्या लग्नापासूनचे मला नीट सांग."

अमितने पुन्हा एकदा कटिंग चहा मागवला.

"मी आणि दीपालीने लग्न करायचं म्हणून म्हाडाच्या लॉटरीतून लागलेलं घर तुझ्या मदतीने सायन प्रतीक्षानगरला घेतलेलं होते. त्यात मी तिला आवडीच्या अशा सर्व गोष्टी विकत घेतलेल्या आठवतंय का?"